# ठाणे महानगरपालिका

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

---

**वृत्तविशेष क्र.२९८** दिनांक : २५ फेब्रुवारी, २०११.

## ठाणे महापालिकेच्या २०१०-२०११चा सुधारीत व २०११-२०१२च्या मुळ अर्थसंकल्पास स्थायी समितीची मंजूरी

**ठाणे (२५) :** ठाणे महानगरपालिकेच्या सन २०१०-२०११ चा सुधारीत व सन २०११-२०१२च्या मुळ अर्थसंकल्पास आज स्थायी समितीने मान्यता दिली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी स्थायी समिती सभापती मिलिंद पाठणकर हे होते.

ठाणे महानगरपालिकेचा सन २०१०-२०११चा महापालिका आयुक्तांनी सादर केलेला सुधारीत अर्थसंकल्प हा १३४०.७४ कोटी रुपयांचा होता. त्यामध्ये स्थायी समिती सदस्यांनी फेरफार करुन त्यात ८४ लक्ष रुपयांची वाढ केली. तर सन २०११-२०१२च्या रू.१७३६.२३ कोटी रुपयांच्या मुळ अंदाजपत्रकात बदल करुन १७६७ कोटी ४३ लक्ष रुपयांच्या अर्थसंकल्पास स्थायी समितीने मंजूरी दिली.

यावेळी स्थायी समितीने शहर विकास विभागात रु.५.०० कोटीची वाढ, जकात विभागाच्या उत्पन्नात वाढ करुन ते ४२४ कोटी १५ लक्ष, मालमत्ता १९२ कोटी २५ लक्ष, पाणी पुरवठा आकार ८० कोटी असे मिळून एकूण महापालिका उत्पन्नात रु.८७८ कोटी ६० लक्ष इतकी वाढ सुचविली आहे. स्थायी समितीने सदस्यांनी केलेल्या सुचनांसह हया सुधारीत व मुळ अर्थसंकल्पास मंजूरी दिली.

यावेळी विरोधी पक्ष नेते नजीब मुल्ला, नगरसेवक राम रेपाळे, दिलीप बारटक्के, गणेश साळवी, नगरसेविका कविता पाटील, सुरेखा खातू, नगरसेवक दिनेश कांबळे, भैय्यासाहेब इंदिसे आदींची भाषणे झाली.

यावेळी खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आले.

१) परिवहन सेवा - रॉयल्टीवर १०० बसेस घेणे

रु. १० लक्ष वरील टेंडर e tendering

२) भांडवली खर्चातील रु. ५ कोटी नवीन बसेस साठी

३) अग्निशमन - अन्न परवाना फी देतांना अग्निशमनचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे

४) अग्निशमन - दरवाढ

५) फायर सिस्टिम

६) कॅपिटेशन फी ऐवजी अग्निशमन सेवा फी

७) समाज विकास विभाग - महिला बालकल्याण योजना

८) जिद्द शाळा मुलांच्या औषधोपचाराचा खर्च अपंगांसाठी कल्याणकारी योजनेतून

९) आस्थापना - जादा कामाचा भत्ता

१०) शहर विकास - वास्तू विशारद लायसन्स फी, इतर दरवाढ

११) परवाना - दुकाने, कारखाने परवाना

१२) शाळा भाडे ठराव

१३) प्रदुषण - C.C. पासून O.C. पर्यंतच्या कालावधीची फी विकासकाकडून

१४) स्थावर मालमत्ता मैदान भाडे

१५) नाला प्रवाह जोडणे

१६) शाळांमध्ये वॉटर प्युरीफायर, फायर यंत्रणा इ. बसविणे, शाळांची साफसफाई

१७) फायर स्टेशन BOT

१८) पार्कींग प्लाझा BOT

१९) महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांचे मेडिकल चेकअप सहा महिन्यातून एकदा

२०) मुलींना १००० रुपयाचे बॉन्ड किंवा NSC काढून देणे व सातवी इ. पास झाल्यावर व्याजासह त्याचे पैसे देणे.

२१) इ. ८ वी च्या मुलींना सायकल

1.